एकीकडे ‘घर घर मोदी’चा प्रचार, दुसरीकडे ‘नमो सन्मान’वर सवाल

चंद्रशेखर बोबडे, लोकसत्ता

> ‘‘सरकारी योजनेचा लाभ मिळवण्यासाठी योजनेच्या अटी-शर्तींची पूर्तता करावी लागते. ९७ लाख पात्र शेतकऱ्यांपैकी ८५ लाख शेतकऱ्यांना नमो शेतकरी सन्मान योजनेचा निधी मिळाला आहे. मात्र ज्यांनी केवायसी प्रमाणीकरण व बँक खात्याशी आधार क्रमांक जुळवणी केली नाही. ते शेतकरी वंचित राहिले. शासनाने त्यासाठी विशेष शिबीर लावले आहे. ‘शासन आपल्या दारी’च्या माध्यमातून सरकार लोकांच्या दारापर्यंत जात आहे. ‘घर घर मोदी’ अभियानाच्या माध्यमातून आम्ही लोकांना हीच बाब पटवून देत आहोत व त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत.’’ - **चंदन गोस्वामी,** प्रवक्ते, भाजप, नागपूर

नागपूर : राज्यात एकूण लाभार्थी संख्या ९७ लाख, अनुदान वाटप झालेले ८५ लाख, अनुदानापासून वंचित १२ लाख. हे सरकारी आकडे आहेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने राज्य शासनाने या वर्षीच्या अर्थसंकल्पात घोषित केलेल्या नमो शेतकरी महासन्मान योजनेचे. यातून योजनेपासून वंचित शेतकऱ्यांची संख्या कळते. एकीकडे भाजप ‘घर घर मोदी’ अभियानाच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांचा प्रचार करीत असताना दुसरीकडे पंतप्रधानांच्याच नावाने सुरू केलेल्या योजनेपासून लाखो शेतकरी वंचित असल्याचे विरोधाभासी चित्र पाहायला मिळत आहे. यामुळे पक्षाचे अभियान राबवताना कार्यकर्त्यांची मोठी अडचण झाली आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मोदी यांना पुन्हा पंतप्रधानपदी बसवण्यासाठी भारतीय जनता पक्षाने जोरदार तयारी सुरू केली आहे. याच तयारीचा एक भाग म्हणून प्रत्येक जिल्ह्यात ‘घर घर मोदी’ अभियान राबवले जात आहेत. कार्यकर्ते लोकांच्या घरी भेट देऊन त्यांना केंद, राज्य सरकारच्या योजनांची माहिती देतात. लोकांच्या मनात मोदींची प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न करतात.

पण महाराष्ट्रात भाजपच्या पाठिंब्यावरील सरकारच्या योजनेमुळे वरील अभियानाच्या उद्देशालाच तडा जातो की काय, असे चित्र निर्माण झाले आहे. त्याला कारण ठरली ती केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्य सरकारने सुरू केलेली नमो शेतकरी महासन्मान योजना. या योजनेसाठी पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपये राज्य शासन देणार आहे. म्हणजे केंद्राच्या योजनेतून सहा आणि राज्याच्या योजनेतून सहा, असे एकूण १२ हजार रुपये शेतकऱ्यांना मिळणार आहेत.

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वर्षी मांडलेल्या अर्थसंकल्पात या योजनेचा समावेशही केला. या योजनेला नमो कृषी सन्मान योजना, असे नाव देण्यात आले. मात्र या योजनेचा केंद्राचा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाला, पण राज्याच्या वाट्याची म्हणजेच नमो शेतकरी सन्मान योजनेची रक्कम एकूण पात्र शेतकऱ्यांपैकी (९७ लाख) राज्यातील १२ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली नाही.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर जिल्ह्यातील ५४ हजार शेतकरी या योजनेपासून वंचित आहेत. याची प्रचंड नाराजी शेतकऱ्यांमध्ये आहे. विशेष म्हणजे प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख जमा होणार या मोदींच्याच घोषणेप्रमाणेच हासुद्धा निवडणूक ‘जुमला’ आहे का? असा सवाल आता शेतकरी ‘घर घर मोदी’ अभियान राबवणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांना विचारत आहेत. विशेष म्हणजे पंतप्रधानांच्या नावे ही योजना असल्याने कार्यकर्त्यांची अधिक अडचण होत आहे.

दरम्यान, योजनेचा लाभ न मिळण्यासाठी कृषी विभाग शेतकऱ्यांना दोष देतो आहे. शेतकऱ्यांनी त्यांची बँक खाती आधार क्रमांकाशी जोडली नाहीत, केवायसीचे प्रमाणीकरण केले नाही, त्यामुळे त्यांच्या खात्यात रक्कम जमा झाली नाही, असा दावा केला जातो आहे. पण असे असेल तर केंद्राच्या योजनेचा हप्ता कसा जमा झाला, असा सवाल शेतकरी करू लागले आहेत.

एकूणच राज्यातील भाजपप्रणीत सरकारच्या लालफीतशाहीचा फटका सध्या तरी या योजनेला बसला असून ‘घर घर मोदी’ अभियान राबवताना लोकांच्या प्रश्नाला तोंड द्यायचे कसे, असा प्रश्न कार्यकर्त्यांना पडला आहे. याची दखल घेत शासनाने केवायसी व आधार क्रमांक जुळवणीसाठी विशेष शिबिरे आयोजित केली आहेत. पण ‘बुंद से गई ओ....’ तशी अवस्था राज्य शासनाच्या योजनेची झाली आहे.

द्वेषाची भाषा बोलणारा वर्ग उच्चशिक्षित

डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांची खंत; डॉ. मनोजकुमार पाण्डेय यांचा सत्कार

डॉ. पाण्डेय यांचा सत्कार करताना अजय पाटील. सोबत प्रा. रवी शुक्ला, डॉ. वंदना खुशलानी, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, डॉ. सागर खादीवाला.

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : पुस्तके वाचणारी प्रत्येक व्यक्ती इतर व्यक्तीला वाचेलच असे नाही. पुस्तके वाचण्याला जेवढे महत्त्व ते देतात, तेवढेच महत्त्व त्यांनी व्यक्तीला वाचण्यास दिले असते, तर देश आज एवढ्या विकृत स्थितीत राहिला नसता. द्वेषाची भाषा बोलणारा सामान्य, अतिसामान्य वर्ग नाही, तर उच्चशिक्षित वर्ग आहे, अशी खंत अखिल भारतील मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी व्यक्त केली.

अखिल भारतीय हिंदी संस्था संघ, नवी दिल्ली व महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे-विदर्भ प्रांत यांच्यावतीने मध्यप्रदेश साहित्य अकादमीकडून अखिल भारतीय सन्मानाने पुरस्कृत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे विभागाध्यक्ष डॉ. मनोजकुमार पाण्डेय यांचा सत्कार करण्यात आला यावेळी ते बोलत होते. शंकरनगरातील धनवटे सभागृहात आयोजित या सत्कार सोहोळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वंदना खुशलानी, डॉ. सागर खादीवाला तसेच अजय पाटील उपस्थित होते. महाराष्ट्र हे असे राज्य आहे, जिथे सर्व धर्म, भाषा यांचा सन्मान राखला जातो, असे प्रतिपादन अजय पाटील यांनी केले.

डॉ. मनोजकुमार पाण्डेय यांचे कार्य मोठे असून हिंदी भाषेसाठी ते तनमनधनाने काम करतात, असे पाटील म्हणाले. डॉ. मनोजकुमार पाण्डेय हे भविष्यात यशस्वीतेचे नवे परिमाण प्रस्थापित करतील, असे प्रतिपादन डॉ. सागर खादीवाला यांनी केले. पुस्तकातून व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व दिसून येते, असे प्रतिपादन डॉ वंदना खुशलानी यांनी केले. सन्मान हा कोणत्याही व्यक्तीचा नसतो, तर ती व्यक्ती हे एक माध्यम असते. या सन्मानामुळे माझी जबाबदारी वाढली आहे, असे डॉ. मनोजकुमार पाण्डेय म्हणाले. मध्यभारताचे केंद्र नागपूरच का, या विषयावर व्याख्यानमाला आयोजित केली जावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. संचालन प्रा. रवी शुक्ला यांनी केले.

दैनंदिनी

- पीस संस्था - ‘निर्भय बनो’ या सभेत डॉ. विश्वंभर चौधरी, ॲड. असीम सरोदे, प्रा. सुरेश द्वादशीवार व लीलाताई चितळे यांचे व्याख्यान, डॉ. वसंतराव देशपांडे सभागृह, सिव्हिल लाईन्स, सायंकाळी ५ वाजता.
- संस्कार भारती व पुल्लीवार परिवार - ज्येष्ठ कवी-गीतकार दिवं. मुकुंद पुल्लीवार रचित ‘अमृत घट’ या काव्य-गीत संग्रहाचे प्रकाशन, प्रमुख अतिथी : रा.स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, सायंटिफिक सभागृह, लक्ष्मीनगर, सायंकाळी ६.३० वाजता.

ट्रकच्या धडकेत महिला ठार, मुलगा जखमी

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : महापालिकेच्या कचरा नेणाऱ्या ट्रकने चिरडल्यामुळे एका महिलेचा जागीच मृत्यू झाला तर तिचा मुलगा जखमी झाला.

ही घटना गिट्टीखदान पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रेरणा कॉलनी परिसरात बुधवारी सकाळी घडली. सीमा किशोर चौधरी (वय ३८, रा. रा.सुरेंद्रगड गवळीपुरा) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. सीमा चौधरी या मुलगा आदित्यसह दुचाकीवरुन जात असताना ट्रक क्रमांक (एम. एच. ३१, एफ. सी-७१३५) ने त्यांना जोरदार धडक दिली.

...म्हणून अजित पवार काकांना वारंवार भेटतात- वडेट्टीवार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : शरद पवार भाजपसोबत आल्याशिवाय अजित पवार यांना मुख्यमंत्री होता येणार नाही, अशी अट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घातली आहे. म्हणून अजित पवार हे शरद पवार यांची वारंवार भेट घेत आहेत, असा दावा विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. ते आज नागपुरात माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना फोडूनही भाजपची राज्यातील स्थिती सुधारत नाही. शरद पवार हे लोकप्रिय नेते आहेत. त्याच्याशिवाय लोकसभेत भाजपचा आकडा वाढू शकत नाही. त्यामुळे अजित पवार हे शरद पवार यांची भेट घेत आहेत, असा दावाही वडेट्टीवार यांनी केला.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
(महाराष्ट्र शासनाची संस्था)
विभागीय कार्यालय, औरंगाबाद, सिटी सर्व्हे नं. ११९४९, शॉप नं. ३०५, तिसरा मजला, साई ट्रेड सेंटर, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद
फोन नं. ०२४०-२६५३५१५ | ई-मेल: domedaabad@mahaurja.com

ई-निविदा सूचना

जिल्हा वार्षिक योजना, औरंगाबाद अंतर्गत औरंगाबाद तालुक्यातील विविध जि.प.शाळेसाठी प्रत्येकी ५ कि.वॅ. क्षमतेचे पारेषण विरहीत सौर सयंत्रे व अमृत योजने अंतर्गत न.पं.सेनगाव जिल्हा परभणी येथे ५० कि.वॅ. क्षमतेचे पारेषण संलग्न सौर विद्युत सयंत्र नेट मिटरींगसह पाच वर्षाच्या कालावधीसाठी सर्वकक्ष (CMC) देखभाल दुरुस्तीसह आस्थापित करणेसाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

निविदा संबंधित सविस्तर माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. प्राप्त ई-निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे बाबतचे सर्व अधिकार विभागीय महाव्यवस्थापक महाऊर्जा, औरंगाबाद यांनी राखून ठेवले आहे.

स्वाक्षरी/-
विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा, औरंगाबाद

सार्वजनिक सूचना

ही विक्रेते, ग्राहक आणि सौरउद्योगाशी संबंधित मोठ्या प्रमाणावर जनतेच्या लक्षात आणून देण्यासाठी आहे की, **यवतमाळचे** आमचे माजी प्रादेशिक भागीदार, मेसर्स गॅलेक्सी सोलर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेडचे **स्वप्नील जगताप** आता आमच्या कंपनीशी संबंधित राहिलेले नाहीत. तथापि, आमच्या माहितीत असे आले आहे की श्री स्वप्नील जगताप यवतमाळ विभागातील विविध ग्राहकांशी आमच्या कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून संपर्क साधत आहेत आणि प्रस्ताव तयार करतात, वर्क ऑर्डर मिळवतात, देयके गोळा करतात आणि विक्रीनंतरची सेवा करतात. आम्ही लोकांना सावध करू इच्छितो. श्री स्वप्नील जगताप किंवा त्यांच्या वतीने उपस्थित असलेली कोणतीही व्यक्ती अधिकृत नाही किंवा त्यांना सौर प्रकल्प कसे कार्यान्वित करावे यासाठी आवश्यक तांत्रिक माहिती नाही आणि त्यामुळे सौर ऊर्जा प्रकल्पाची अयोग्य स्थापना आणि कार्यान्वित झाल्यामुळे कोणतीही अप्रिय घटना घडू शकते. श्री स्वप्नील जगताप आणि संबंधित ग्राहक यांची जबाबदारी असेल. अशा घटनांसाठी गॅलेक्सी सोलर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड जबाबदार राहणार नाही. जर तुम्हाला श्री. स्वप्नील जगताप यांच्याकडून असे कोणतेही प्रस्ताव आले किंवा गॅलेक्सी सोलर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेडच्या नावाने इतर कोणत्याही व्यक्तीने किंवा कंपनीने असे चुकीचे प्रतिनिधित्व केल्याची माहिती असल्यास, कृपया वाईट कृत्ये रोखण्यासाठी योग्य कारवाई करण्यात आम्हाला मदत करा. त्याच्याशी संबंधित कोणतीही चौकशी माहिती खालीलप्रमाणे संदर्भित केली जाऊ शकते:

जनसंपर्क अधिकारी
गॅलेक्सी सोलर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड
मोबाईल: 7499160453
E-mail: info@galaxysolarenergy.com
SPECTRUM

न्यायालय अपर जिला न्यायाधीश महोदय सौंसर
418/23
26/07/23
अपीलार्थी:- चैताली पिता मधुकरराव बनिया
निवासी- द्वारा नरेन्द्र ढवले 164, सनमन अपार्टमेंट
दालवी नगर चिचवाड, रेल्वे ब्रिज के पास पूना, तहसील व जिला पूना (महाराष्ट्र)
विरूद्ध
उत्तरवादीगण:- देवेन्द्र कुमार एवं अन्य
व्य. अपील क्र. MJC CMJC 16/2019
पेशी तारीख : 12.09.2023
वाद के निपटारे हेतु समंस
(आदेश 5 नियम 1 और 5)
प्रेषिति :-
(1) मनीषा विधवा बाबाराव कापसे उम्र 58 वर्ष
निवासी / पोस्ट- नागपुर जुनी शुक्रवारी गांधी पुतले के पास जिला नागपुर (महाराष्ट्र)
(2) आशीष पिता पदमाकरराव सावलकर उम्र लगभग 35 वर्ष
निवासी- नागपुर, शांति नगर जिला नागपुर (महाराष्ट्र)

अपीलार्थी चैताली पिता मधुकरराव बनिया द्वारा आपके विरुद्ध प्रथम अपील MJC 16/2019 इस न्यायालय में संस्थित किया गया है, आपको इस न्यायालय में तारीख 12/09/2023 को दिन में 11:00 बजे दावे का उत्तर देने के लिए उपसंजात (हाजिर) होने के लिए समंस किया जाता है, आप न्यायालय मे स्वयं या किसी ऐसे प्लीडर द्वारा उपसंजात हो सकते है जिसे सम्यक अनुदेश दिये गये हो और जो इस वाद से संबंधीत सभी सारवान प्रश्नो का उत्तर दे सके या जिसके साथ ऐसा कोई व्यक्ति हो जो ऐसे सब प्रश्नो का उत्तर दे सके । न्यायालय मे आपके उपसंजातीय के लिए जो दिन नियत किया गया है वह इस वाद के अंतिम निपटारे के लिए नियत दिन है इसलिए आपको उस दिन उन सब साक्षियो को या उन सब दस्तावेजो को पेश करने के लिए तैयार रहना चाहिए जिन पर आप अपनी प्रतिरक्षा के लिए निर्भर रहना चाहते है ।

आपको सुचित किया जाता है कि यदि आप उपर बताई गई तारीख को इस न्यायालय मे उपसंजात नही होगे तो वाद की सुनवाई और उसका निपटारा आपके अनुपस्थिती मे किया जावेगा ।

यह आज तारीख 17/08/2023 को मेरे हस्ताक्षर से और न्यायालय की मुद्रा लगाकर दिया गया है ।
सौंसर, हस्ता/-
दिनांक : 26-07-2023 विवेक कुमार सिंह
अपर जिला न्यायाधीश सौंसर, जिला छिंदवाडा म.प्र.

मध्य रेल्वे
ई-निविदा सूचना
खुली निविदा सूचना क्र.:DRMWNGP-60-2023-01, दि. 11-08-2023.
कामाचे नाव: 1) 1) नागपूर-वर्धा अनुभागादरम्यान 1) किमी 779.970-782.570 = 2.600 किमी. डीएनआरडी 2) किमी 800.000-800.875 = 0.875 किमी युपीआरडी 3) किमी 802.00-803.000 = 1.000 किमी युपीआरडी 4) किमी 814.470-822.120 = 7.650 किमी डीएनआरडी 5) किमी 823.759-825.500 = 1.741 किमी डीएनआरडी अशा एकूण किमी = 13.866 किमी येथे प्रस्तावित टीआरआर (पी). 2) एडीईएन काटोल उप-विभागांतर्गत कळमेश्वर येथे गुड्स शेड लाईनच्या आमला टोकावरील सीएसआर - 720 मी. च्या संपूर्ण लांबीच्या शंटिंग नेक चे प्रस्तावित बांधकाम. 3) एडीईएन (एस) नागपूर उप-विभागांतर्गत बीटीबीआर - यूआरआर वरील किमी 841.00 - 843.00 = 2.00 किमी दरम्यान प्रस्तावित संपूर्ण ट्रॅक नुतनीकरण. **अंदाजे खर्च:** रु. 2,6093237.04/- **बयाणा रक्कम:** रु. 280500/- निविदा बंद होण्याचा दिनांक व वेळ: **01-09-2023 रोजी 15.00 वा.** तपशील रेल्वेच्या वेबसाईटवर **www.ireps.gov.in** येथे उपलब्ध आहे.
VAPL/14/195 डीआरएम (डब्ल्यू), नागपूर
तिकिटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा

संपत्तीची ऑनलाइन ई-लिलाव विक्री
कोटक महिंद्रा बँक लिमिटेड
kotak
Kotak Mahindra Bank
नोंदणीकृत कार्यालय: 27 बीकेसी, सी 27, जी-ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (ई) मुंबई, महाराष्ट्र, पिन कोड-400 051 **शाखा कार्यालय:** 5 वा मजला, एडमास प्लाझा, 166/16, सीएसटी एओड, कलीना, सांताक्रुझ (इ) मुंबई 400098.
स्थावर संपत्तीच्या विक्रीसाठी विक्री सूचना

ई लिलाव विक्री नोटीस, स्थावर संपत्तीच्या विक्रीसाठी जे सिक्योरिटायझेशन एन्ड एइकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स एन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्योरिटी इंट्रेस्ट एक्ट, 2002 प्रमाणे आहे नियम 8(5) प्रमाणे, वाचावे नियम 9 (1) साठी प्रोव्हिसोसह, द सिक्योरिटी इन्ट्रेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 साठी. याद्वारे सर्वसाधारणपणे सार्वजनिक आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार यांना दिलेली आहे जी खाली वर्णन केलेली अचल संपत्ती गहाण ठेवली आहे, तारण ठेवलेल्या ज्यापैकी फुलर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लि. (FIHFCL) च्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतले होते, 20.02.2023 रोजी सुरक्षित कर्जदार आणि "FIHFCL" द्वारे मर्यादित कोटक महिंद्रा बँकेच्या नावे कर्ज नियुक्त केल्याच्या अनुषंगाने ही संपत्ती **दि. 12.9.2023 रोजी दुपारी 12:00 ते 1:00 दरम्यान अमर्यादित 5 मिनिटांच्या मुदती सह, "जशी आहे तशी", "जिथे आहे तिथे", आणि "जे काही आहे" प्रकारावर आणि त्यासंबंधी रु. 2,10,86,649 /- (रुपये दोन कोटी दहा लाख शेहाऐंशी हजार सहाशे एकोणचाळीस फक्त) दि. 10-8-2023** पर्यंत भविष्यात लागू व्याजासह, नगण्य प्राप्तीपर्यंत विकली जात असून ही कर्ज खाता क्रमांक 604707210203833, कोटक महिंद्रा बँक लि. कडे बाकी वसूली साठी सुरक्षित कर्जदार श्री बब्बू रहेमतुल्ला शेख, श्रीमती आबेदा बब्बू शेख, मे. समीर कॉटन ट्रेडिंग कंपनी आणि श्री. समीर बाबू शेख यांच्या संबंधी आहे. यासाठी राखीव किंमत आहे रु. 90,00,000/- (केवळ रुपये नव्वद लाख) आणि बयाणा ठेव रुपये आहे 9,00,000/- (रु. नऊ लाख फक्त) आणि केव्हायसी सह बयाणा जमा करण्याची शेवटची तारीख 11.9.2023 ते संध्याकाळी 6:00 (IST) पर्यंत आहे. **संपत्तीचे वर्णन:** संपत्तीसंबंधी सर्व प्रकार ज्यात सामील आहे आर.सी.सी. सुपरस्ट्रक्चर आणि पार्सल अपार्टमेंट क्र. 101 आणि 102, कव्हरिंग सुपर बिल्ट अप क्षेत्र 234.1286 चौ. मीटर. (117.0643 वर्ग मीटर+117.0643 वर्ग मीटर) "सुजाता अपार्टमेंट" इमारतीच्या पहिल्या मजल्यावर असून 33.332% अविभाजित वाटा आणि व्याज आणि भू-भाडेपट्टी नसलेल्या भूखंडाचा समावेश आहे, ज्यात क्रमांक 186, खसरा क्र. 19/1, 20 आणि 21 मौजा - भामटी, बेअरिंग सिटी सर्व्हे क्र. 5, पत्रक क्र. 193K/4, नागपूर सुधार ट्रस्ट आणि तहसील आणि जिल्हा नागपूरमधील नागपूर महानगरपालिका- 440022 च्या हद्दीत आहे. जमिनीच्या **चतुष्सीमा: पूर्व:** भूखंड क्रमांक 187, **पश्चिम:** भूखंड क्रमांक 185, **उत्तर:** भूखंड क्रमांक 206/अ आणि 207, **दक्षिण:** रस्ता.

या ठिकाणी कर्जदारांचे लक्ष अपेक्षित आहे कि प्रावधानातील उपकलम 8 आणि कलम 13 प्रमाणे, उपलब्ध वेळेनुसार सुरक्षित संपत्ती मिळवणे शक्य आहे. त्याच बरोबर सार्वजनिक जनता आणि संबंधित कर्जदार यांना हे कळवणे कि येथे ठराव केलेले लिलाव कोणत्याही कारणास्तव अयशस्वी झाल्यास सुरक्षित कर्जदार सुरक्षेची सुरक्षा व्यवस्था लागू करू शकतात .विक्री अंतर्गत मालमत्तेबाबत कोणत्याही स्पष्टीकरण/आवश्यकतेच्या बाबतीत, बोलीदार **श्री. AGNEL PILLAI (+91 8976929685), श्री. राजेंद्र दहिया (+91 8448264515).** विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, कृपया **HTTPS://WWW.KOTAK.COM/EN/BANK-AUCTIONS.HTML** या लिंकचा संदर्भ घ्या. **WWW.KOTAK.COMAND**/किंवा **HTTP://BANKAUCTIONS.IN**
स्थळ: नागपूर, दिनांक: 17-08-2023 अधिकृत अधिकारी, कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

MAHINDRA RURAL HOUSING FINANCE LTD.
कार्पोरेट ऑफिस : साधना हाऊस, दुसरा माळा, 570, पि.बी. मार्ग, वर्ली, मुंबई - 400 018, इंडिया.
फोन नं. : 22 66523500, फॅक्स : +91 22 24972741, सिआयएन - U65922MH2007PLC169791
रिजनल ऑफिस : यश कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.27, शॉप नं. 6 आणि 7, नवीन बस डेपो, विद्या विहार कॉलनी, मोर्शी.444905

ताबा सुचना (अचल संपत्ती) रुल 8-(1)

ज्याअर्थी, सिक्युरिटाईजेशन आणि रीकन्स्ट्रक्शन ऑफ फाईनैंशियल असेटस एंड एनफोर्समेंट ऑफ सिक्यूरिटी इंटरेस्ट ऍक्ट 2002 च्या अंतर्गत खालील हस्ताक्षरकर्ता हे (महिंद्र रुरल हाऊसिंग फायनांस लि.) चे अधिकृत अधिकारी आहे. तसेच सिक्यूरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स 2002 चे सेक्शन 13(12) च्या सोबतच वाचले जाणारे रुल 3 च्या अंतर्गत खालील उल्लेखित कर्जदारांना डिमांड नोटिस सुचना प्राप्तीनंतर 60 दिवसांचा आत भरपाई करण्याच्या उद्देशाने सुचना मध्ये दर्शविलेल्या तारखेला दिली होती. कर्जदार रक्कमेची भरपाई करण्याकरीता असमर्थ सिध्द ठरल्यामुळे कर्जदार तसेच आम जनतेला याव्दारे सुचना देण्यात येते की, खालील दिलेल्या 13(4) सह वाचला जाणाऱ्या ॲक्ट कार्य क्र. 8 च्या अंतर्गत खालील हस्ताक्षरकर्त्याने खालील दिलेल्या संपत्तीचा प्रत्यक्ष ताबा खालील उल्लेखित तारखेला घेतला आहे. विशेष करुन खालील कर्जदार तसेच आम जनतेला या व्दारा वरील संपत्तीच्या विषयी काहीही घेणे देणे न करण्याकरीता जागृत केले जात आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रक्कमेवरील व्याजाचे आणि अन्य खर्चाचे देणेघेणे (महिंद्र रुरल हाऊसिंग फायनांस लि.) व्याजासह प्रभाराधिन राहिल. कर्जदारांनी लक्ष द्यावे की सेक्शन 13 च्या सब-सेक्शन (8) च्या प्रावधानानुसार मालमत्ता परत सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेमध्ये आमंत्रित केले आहे.

अनु. क्र.	कर्जदाराचे / जमानतदाराचे नाव (शाखेचे नाव)	सुरक्षित ठेविचे विवरण (अचल संपत्ती)	मांग सुचनेची तारीख आणि रक्कम	ताबा घेतल्याची तारीख
1.	(LOAN NO. XRESMOS00716691/ 883992, मोर्शी) बाबाराव दादाराव मनोहरे, उज्वला बाबाराव मनोहरे, विनायक चिंतामन वानखेडे, रा. सावरखेड, तह. मोर्शी आणि जि. अमरावती	जमिनीचा सर्व भाग व तुकडा जमीन बांधकाम बांधलेले बेअरिंग घर नं. 276, वार्ड नं. 1, रा. सावरखेड, ग्रामपंचायत- सावरखेड, तह.- मोर्शी, जि. अमरावती आणि चतुर्सिमा:- उत्तर: श्री. मनोहरे यांचे घर, दक्षिण: रोड, पुर्व: श्री. कुमार तायडे यांचे घर, पश्चिम: श्री. राजकुमार नागर्डे यांचे घर	मांग सुचनेची तारीख 19/09/2020 रु. 1,35,609/- (रुपये एक लाख पस्तीस हजार सहाशे नऊ फक्त) पेमेंट केल्याच्या तारखेपर्यंत त्यावरील पुढील व्याज	11.08.2023 (प्रत्यक्ष)

स्थळ : मोर्शी
दिनांक : 17 / 08 / 2023
सही. अधिकृत अधिकारी
(महिंद्र रुरल हाऊसिंग फायनांस लि.)

MUZALI ARTS LIMITED

Statement of Unaudited Results for the Quarter Ended June 30, 2023

(Rs. In Lakhs)

	Particulars	Quarter Ended			Year Ended
		30/06/2023 (Unaudited)	31/03/2023 (Audited)	30/06/2022 (Unaudited)	31/03/2023 (Audited)
1	Revenue from Operations	-	-	40.99	106.79
2	Other Income	8.58	7.81	9.41	37.17
3	Total Revenue (1 + 2)	8.58	7.81	50.40	143.96
4	Expenses				
	Cost of materials consumed	-	-	-	
	Purchase of stock-in-trade	-	-	25.51	71.23
	Changes in inventories of finished goods, work-in-progress and stock-in-trade	-	-	(2.02)	(2.02)
	Employee benefits expense	10.00	11.07	25.14	62.72
	Depreciation and amortisation expense	0.32	0.52	0.17	1.04
	Finance Cost	-	-	3.75	10.83
	Other expenses	16.63	11.93	22.79	82.20
	Total expenses	26.95	23.52	75.34	226.00
5	Profit/(Loss) Before Exceptional item and Tax (3-4)	(18.37)	(15.71)	(24.94)	(82.04)
6	Exceptional items	(1.70)	22.83	-	245.01
7	Profit/(Loss) Before Tax (5-6)	(16.67)	(38.54)	(24.94)	(327.05)
8	Tax expense				
	(1) Current Tax	-	-	-	-
	(2) Deferred Tax	-	-	-	-
	(2) Excess/ Short Provision of tax relating to earlier years		(7.94)		(7.94)
9	Profit / (Loss) from continuing operations (7 - 8)	(16.67)	(30.60)	(24.94)	(319.11)
10	Profit / (Loss) from discontinuing operations	-	-	-	-
11	Tax expense of discontinuing operations	-	-	-	-
12	Profit/(loss) from Discontinuing operations (after tax)	-	-	-	-
13	Profit (Loss) for the period (9+12)	(16.67)	(30.60)	(24.94)	(319.11)
14	Other Comprehensive income;				
	A (i) Items that will not be reclassified to profit or loss	2.36	589.93	(68.60)	589.93
	(ii) Income tax relating to items that will not be reclassified to profit or loss	-	-	-	-
	B (i) Items that will be reclassified to profit or loss	-	-	-	-
	(ii) Income tax relating to items that will be reclassified to profit or loss	-	-	-	-
15	Total Comprehensive Income for the period (13+14) (Comprising profit/ (loss) and other Comprehensive Income for the period	(14.31)	559.33	(93.54)	270.82
16	Earnings per equity share (for discontinued & continuing operations) of face value of Re. 1 each				
	(a) Basic	(0.03)	(0.54)	(0.11)	(0.54)
	(b) Diluted	(0.03)	(0.54)	(0.11)	(0.54)

Notes: The above is the extract of the detailed format of Unaudited Financial Results as on 30th June 2023 Under Regulation 33 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirement) Regulation 2015.

PLACE : NAGPUR
DATE : 14.08.2023

For and on behalf of the Board of
MUZALI ARTS LIMITED
Farheen Murtuza Mansoorbhai
Managing Director
DIN No. 08965752

फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि.
FEDBANK
FINANCIAL SERVICES LIMITED
कॉर्पोरेट कार्यालय कनाकिया वॉल स्ट्रीट, ए-विंग, 5 वा मजला, युनिट क्रमांक 501, 502, 511, 512 अंधेरी-कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई, महाराष्ट्र - 400093

ताबा सुचना

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे 'फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि. चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, **2002 (2002 चा 54)** अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, **2002** च्या नियम **3** सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद **13(12)** अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत **दि. 14 जुन 2023** रोजी एक मागणी सूचना पाठवली ज्यात कर्जदार, गहाणदार, सह-कर्जदार आणि जामीनदार) **(१) सूर्यकांत इसनराव हत्तीमारे (कर्जदार) (२) अर्चना सूर्यकांत हत्तीमारे (सह-कर्जदार)** यांना मागणी सूचनेत नमूद केलेल्या कर्ज खाते क्रमांक **FEDNKROHL0494211** मधील **दि. 09-06-2023** रोजी नुसार देय रक्कम **रु. 26,33,111/- (रुपये सव्वीस लाख तेहतीस हजार एकशे अकरा फक्त)** सोबत कराराच्या दराने त्यावरील पुढील व्याज तसेच सर्व खर्च शुल्क आणि आनुषंगिक खर्च इ. या सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत भरणा करण्याचे आवाहन करत होते.

कर्जदार, गहाणदार, सहकर्जदार आणि जामीनदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार, गायणदार, सह- कर्जदार, जामीनदार व सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते को निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकारी यांनी सिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, **2002** मधील नियम 8 सह वाचण्यात येणाऱ्या सरफेसी कायद्याच्या अनुच्छेद **13(4)** अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करीत **दि. 14 ऑगस्ट 2023** रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.

कर्जदार गहाणदार, सहकर्जदार आणि जामीनदार व सर्वसामान्य जनतेस हा सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो फायनान्शियल सर्व्हिसेस लि. यांच्या कर्जखाते क्रमांक FEDNKROHL0494211 मधील **दि. 09-06-2023** रोजी नुसार देय रक्कम **रु. 26,33,111/- (रुपये सव्वीस लाख तेहतीस हजार एकशे अकरा फक्त)** सोबत कराराच्या दराने त्यावरील पुढील व्याज तसेच सर्व खर्च शुल्क आणि आनुषंगिक खर्च इ. च्या भाराधीन असेल.

सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कर्जदार/गहनदारांचे सदर अधनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग 8 कडे वेधण्यात येते.

अनुसूची-। (तारण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन)

संपत्तीचा सर्व भाग आणि तुकडा अपार्टमेंट नं. बी9-बी203, दुसरा मजला,ब्लॉक नं. बी9, बिल्डिंग नं. बी, "सुदामा" नावाने ओळखली जानारी बिल्डिंग प्लॉट नं. 05, खा. नं. 248, 257 / 2, 258 / 1जि, आणि 258 / 2, पी.एच नं. 42, मौजा जामठा, वृंदावन,जिपी. जामठा, ता आणि जि नागपूर 441108 आणि चतुर्सिमा:- पुर्व: अपार्टमेंट नं. बी9-बी202, पश्चिम: टावर 9ए, उत्तर: अपार्टमेंट नं. बी9-बी204, दक्षिण: अपार्टमेंट नं. बी9-बी0208

दिनांक : 17.08.2023
स्थळ : नागपूर
(मजकुरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)
सही / -
प्राधिकृत अधिकारी
फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि.

ICICI Bank
शाखा कार्यालय: आयसीआयसीआय बँक लिमिटेड, विष्णू वैभव कॉम्प्लेक्स, ६वा मजला, २२२ पाम रोड, सिव्हिल लाइन्स, नागपूर- ४४०००१.

जाहीर सूचना - तारण मत्तेच्या विक्रीसाठी निविदा ई- लिलाव
[नियम ८(६) चे तरतुदीकडे पहा]
स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता सूचना

सिक्युरीटायझेशन अँड रियन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ सह नियम ८(६) च्या तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचा ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामन्य लोक आणि विशेषत: कर्जदार आणि जामीनदार यांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जी सिक्युअर्ड क्रेडीटर यांच्याकडे गहाण/ चार्ज्ड करण्यात आली असुन, त्याचा प्रत्यक्ष ताबा आयसीआयसीआय बँक लि.चे अधिकारी यांनी घेतला असून ती ''जसे आहे जिथे आहे'' ''जे आहे ते आहे '', आणि ''तेथे जे असेल ते '' या आधारे होणार आहे, त्याचे तपशील खाली देण्यात आले आहेत.

अ. क्रं.	कर्जदाराचे / सह-कर्जदाराचे / हमीरदाराचे नाव / कर्ज खाते क्रमांक	काही असल्यास ज्ञात बोजासह तारण मत्तेचा तपशील	थकबाकी रक्कम ₹	आरक्षित मूल्य (₹) इसारा अनामत ठेव ₹	मालमत्तेच्या परीक्षणाची तारीख आणि वेळ	ई-लिलाव तारीख आणि वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
1.	श्री चंद्रशेखर बाबुराव नायडू (कर्जदाराचे), श्रीमती सुषमा चंद्रशेखर नायडू (सह-कर्जदाराचे), कर्ज खाते क्रमांक LBNAG00000989068	फ्लॅट क्रमांक एबी-४/IV, चौथा मजला, मौर्या कॉम्प्लेक्स, मानकापूर, रिंग रोड, वार्ड क्र. ६१, पाटील ट्रेडर्सच्या मागे, पटवारी हलका क्र. ११, रचना ट्रेलर्सच्या बाजूला, नागपूर- ४४००३०. मोजमापित क्षेत्र १६०० चौ. फूट	₹ ४५,८८,२३१/- (०७.०८.२०२३ पर्यंत)	₹ २१,६०,०००/- ₹ २,२८,०००/-	ऑगस्ट २५,२०२३ सकाळी ११:०० ते दुपारी ०२:००पर्यंत	सप्टेंबर ०५,२०२३ सकाळी ११:०० पासून
2.	श्री दिनेश राजीराम गजभिये (कर्जदाराचे), श्रीमती प्रिती दिनेश गजभिये (सह कर्जदाराचे), कर्ज खाते क्रमांक LBNAG00002919637	फ्लॅट नं.२-५०२, ५वा मजला, स्टेला २, संदेश सिटी, टाइप- सी, एमझेड जामठा, केएच नं. १६७/२ आणि १६८ पीएसके ४२, जामठा स्टेडियम जवळ नागपूर- ४४०००५. मोजमापित क्षेत्र ७८.३१ चौरस मीटर बिल्ट-अपचे	₹ ३६,०६,४७९/- (०७.०८.२०२३ पर्यंत)	₹ २४,२७,४००/- ₹ २,५६,३००/-	ऑगस्ट २५,२०२३ सकाळी ११:०० ते दुपारी ०२:००पर्यंत	सप्टेंबर ०५,२०२३ सकाळी ११:०० पासून

ऑनलाईन लिलाव युआरएल लिंक- **(URL Link-https://disposalhub.com) मे. नेक्सझेन सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड** या ई-लिलाव एजन्सीच्या वेबसाईटवर आयोजित करण्यात येईल. तारणदार/नोटीसी यांना **दि. सप्टेंबर ०४, २०२३** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजणेपूर्वी एकूण थकबाकी आणि पुढील व्याजासह रक्कम परतफेड करण्याची संधी देण्यात येत आहे. अन्यथा सदर तारण मालमत्तावरील परिशिष्टाप्रमाणे विक्री करण्यात येईल.

संभाव्य बोलीदारांनी बयाणा रक्कम (ईएमडी) **आयसीआयसीआय बँक लिमिटेड, विष्णू वैभव कॉम्प्लेक्स, ६वा मजला, २२२ पाम रोड, सिव्हिल लाइन्स, नागपूर- ४४०००१** यांचेकडे डीमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई पहा) दि. **सप्टेंबर ०४, २०२३** रोजी **संध्याकाळी ०४.००** वाजणेपूर्वी सादर करावी आणि त्यानंतर त्यांनी त्यांचा प्रस्ताव फक्त वर नमूद वेबसाईटमार्फत दि. **सप्टेंबर ०४, २०२३** रोजी **संध्याकाळी ५.००** वाजणेपूर्वी ईएमडीच्या पैसे भरल्याच्या पुराव्यासाठी बँक पोचसह- डीडीची स्कॅन केलेल्या ईमेजसह सादर करणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्यावी, जर संभाव्य बोलीदारांना वेबसाईटमार्फत त्यांचे प्रस्ताव सादर करणे शक्य नसल्यास, स्वाक्षरीकृत निविदा दस्तावेजाची प्रत **आयसीआयसीआय बँक लिमिटेड, विष्णू वैभव कॉम्प्लेक्स, ६वा मजला, २२२ पाम रोड, सिव्हिल लाइन्स, नागपूर- ४४०००१** येथे दि. **सप्टेंबर ०४, २०२३** रोजी **संध्याकाळी ५.००** वाजणेपूर्वी सादर करता येतील. बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत/वर्गीकृत बँकेकडील डीडी/पीओ "**आयसीआयसीआय बँक लिमिटेड**" यांच्या नावे **नागपूर** येथे देय सादर करावा.

पाहणीसंबंधित, ई-लिलावाच्या शर्ती व अटी किंवा निविदा सादर करण्याशी संबंधित कोणत्याही खुलाशाकरिता कृपया संपर्क आयसीआयसीआय बँक लिमिटेडला **८४५४०८१३५३/७३०४९१५५९४/ ९५९५९१३३२२** वर संपर्क करा.

कृपया नोंद घ्यावी की मार्केटिंग एजन्सी **१. मेसर्स नेक्सझेन सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड, २. ऑजीओ ॲसेट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड, ३. मॅटेक्स नेट प्रायव्हेट लिमिटेड** यांनादेखील सदर मालमत्तेच्या विक्री सुविधेसाठी नेमण्यात आले आहे.

कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली स्विकारणे किंवा नाकारणेचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे राखीव आहे. विक्रीच्या विस्तृत शर्ती व अटींकरिता कृपया भेटा, **https://www.icicibank.com/n4p4s.**

दिनांक : ऑगस्ट १७, २०२३
ठिकाण : नागपूर
प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय बँक लिमिटेड